# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


No,CGRF/AZ/AUR/ U / 228 / 2009 /62 / Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Ashok P.Salve,MSEB Staff Quarter, CIDCO, N-4, Aurangabad.*
*(Consumer no. 490010698941)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Ashok P.Salve,MSEB Staff Quarter, CIDCO, N-4, Aurangabad.*

*The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excess bill issued by Distribution Licensee.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 14.07.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*

*Shri Ashok P.Salve,*
*MSEB Staff Quarter,*
*CIDCO, N-4,*
*Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२८/२००९/६२**

**तक्रार दाखल दिनांक :- ०६/०७/२००९**
**निकाल दिनांक :- ३१/०७/२००९**

**श्री अशोक पाचीराम साळवे,**
**महावितरण कंपनी स्टॉफ क्वाटर्स ,**
**३३ के. व्ही. उपकेद्र, एन ४ सिडको,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०६९८९४१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०७/०७/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/०७/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार ते महावितरण कंपनीचे निवृत्त कर्मचारी असुन महावितरणच्या सिडको एन ४ येथील कर्मचारी निवासस्थानात राहतात. वीज बिलाच्या थकबाकीपोटी निवृत्त होतांना त्यांच्या देयक रक्कमेतुन ३०,०००/- रुपये कपात करण्यात आली होती. महावितरणतर्फे त्यांच्या बिलातुन नियमीतपणे कपात न केल्यामुळे त्यांना वीज बिलात व्याज व दंड आकारण्यात आलेले असुन ते रद्द करण्याबाबत त्यांनी महावितरण च्या संबंधित कार्यालयात अर्ज दाखल केला होता.पण त्यांच्या अर्जाची दखल घेण्यात न आल्यामुळे अर्जदाराने मंचात ही तक्रार दाखल केली असुन व्याज व दंड रद्द करुन सुधारीत वीज बिल तसेच नुकसाने भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक १४/०७/२००९ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार गैरहजर होते. नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर यांनी या प्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती मंचास केली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी २१/०७/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक २१/०७/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार हजर होते. महावितरण कंपनीच्या कर्मचा-याचा संप असल्यामुळे नोडल अधिकारी यांनी तारीख पुढे वाढविण्याबाबत विनंती पत्र मंचात पाठविले. पुढील सुनावणी २४/०७/२००९ रोजी घेण्याचे मंचाने निश्चीत केले.

४) दिनांक २४/०७/००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते तसेच महावितरणचे एम.आय.डी.सी.चिकलठाणा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री वायकोस उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे सी.पी.एल. दाखल केले. अर्जदाराच्या पगारातुन रुपये १०००/-प्रति महीना या प्रमाणे एकुण १३ हाप्त्यात वीज बिलाच्या थकबाकीपोटी रक्कम कापण्यात आली असल्याचे त्यांनी सुनावणी दरम्यान सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांना एकुण थकबाकी व एकुण जमा करण्यात आलेली रक्कम याचा ताळेबंद पुढील सुनावणीस दाखल करण्याचा आदेश दिला व पुढील सुनावणी २८/०७/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक २८/०७/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपला जवाब मंचात दाखल केला व अर्जदाराच्या थकबाकीपोटी कापण्यात आलेल्या रकमेतुन ९०००/- रुपये वीज बिलापोटी वळते केल्याचे सांगितले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

६) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळुन येते की अर्जदार हे महावितरण कंपनीचे निवृत्त कर्मचारी असुन ते राहत असलेल्या महावितरण कंपनीच्या कर्मचारी निवासस्थानात त्यांनी वापरलेले वीज बिल थकीत असल्यामुळे त्यांना निवृत्ती नंतर देण्यात येणा-या रकमेतुन ३०,०००/-रुपये वीज बिल थकबाकी व इत्यादी असे कारण दाखवत कपात करण्यात आलेली दिसुन येते. नोडल अधिकारी यांनी ९०००/- रुपये वळते करुन घेतल्याचे मान्य केले पण त्यांच्या आस्थापना विभागातुन माहीती न मिळाल्यामुळे उर्वरीत ४०००/-रुपये रक्कम वळती करुन घेण्यात आली नसल्याचे व त्यामुळे सी.पी.एल.वर त्याची कपात दाखविण्यात आली नाही हे मान्य केले. महाविरणतर्फे नोव्हेबर २००५ ते जुन २००६ या काळात सी.पी.एल.मध्ये एकुण ९०००/-रुपये क्रेडीट दाखवण्यात आल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीच्या ज्युनिअर मॅनेजर

७) यांनी अर्जदारास दिलेल्या वसुली रकमे बाबतच्या पत्रावरुन मे २००५, ते मे २००६ या कालावधीमध्ये दर महा १०००/- रुपये याप्रमाणे एकुण रुपये १३०००/- वीज बिलापोटी पगारातुन कपात केल्याचे अर्जदारास कळविले आहे पंरतु मे २००५, ऑक्टोबर २००५,डिसेंबर २००५ व मार्च २००६ या महीन्यात कपात केलेली रक्कम अस्थपणा विभागाने न कळविल्यामुळे ती सी.पी.एल.मध्ये कपात करण्यात आली नसल्याचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या दिनांक २७/०७/२००९ च्या पत्रावरुन दिसुन येते.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर महावितरणतर्फे अर्जदाराची कपात केलेली रक्कम ही नियमीतपणे जमा करुन न घेण्यात आल्यामुळे त्याना देण्यात आलेल्या वीज बिलात व्याज व दंडाची आकारणी चुकीची करण्यात आलेली दिसुन येते जे योग्य नसल्याचे मंचाचे मत आहे.

मंच या प्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरणतर्फे अर्जदाराच्या पगारातुन कपात केलेल्या एकुण १३०००/- रुपये रक्कमेचे समायोजन योग्य त्या काळावधीमध्ये करुन व्याजाची सुधारीत आकारणी करण्यात यावी. तसेच उर्वरीत देयक अर्जदाराच्या फंडातुन कपात केलेल्या रक्कमेतुन वळते करुन घ्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.**


**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२८/२००९/६२** **दिनांक**

**प्रति,**

श्री अशोक पाचिराम साळवे,
महावितरण कंपनीचे स्टॉफ क्वाटर्स सिडको,
३३ के. व्ही. उपकेद्र, एन ४ सिडको,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०६९८९४१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२२८/२००९/६२ )

आपण दिनांक ०६/०७/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती, सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.

दुरध्वनी क्र.  ०२२-२६५९०३३९.